नि.दि.दावा क्र. ५०/२०२३
मानिकराव वि. महा. शासन
निशाणी क्र. ८९

वादीतर्फे साक्षीदार क्र. २
मी शपथेवर सांगतो की,

माझे नाव- कु. नमिता अशोक सोमकुवर,
वय - ३४ वर्षे, व्यवसाय- भुकर मापक,
राहणार - उप अधिक्षक, भुमि अभिलेख कळमेश्वर,
जिल्हा-नागपुर.

साक्षीदाराचा सरतपास वादीतर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. एम.डी.पालीवाल यांद्वारे शपथेवर सुरु-

१. मला साक्षीकामी कोर्टामार्फत साक्षसमन्स मिळाला होता. दिनांक १५/०७/२०१६ रोजी मी उप अधिक्षक भुमि अभिलेखक, पारशिवनी येथे मी भुकरमापक म्हणुन कार्यरत होतो. मोजणी मामला क्र. १२७३/२०१६ हा सर्वे नं. ८० मौजा-बिटोली येथील दिनांक १५/०७/२०१६ रोजी माझ्याकडे मोजणीसाठी होते आणि मी मोजणी केली. मोजणीचा अर्ज हा मानिकराव दामाजी ठाकुर यांनी केला होता. मोजणीचे मुळ रेकार्ड मी पारशिवनीचे कार्यालयातुन, रितसर पद्धतीने आज रोजी आणले आहे.

२. साक्षीदाराला आर्टीकल 'अ' दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदर आर्टीकल 'अ' हे मुळ नकाशा 'अ' प्रत प्रमाणे बरोबर आहे. मोजणीच्या वेळेस, जे लोक हजर होते त्यांच्या सहया घेतल्या. काही लोकांनी सहया करण्यास नकार दिला होता. मोजणीच्या वेळेस, नरेश चौधरी हजर होते परंतु त्यांनी सही करण्यास नकार दिला होता. मानिकराव ठाकुर हे मोजणीच्या वेळेस हजर होते. हजर असणा-या लोकांचे जबाब आणि सहया 'अ' प्रतीसोबत आहेत.

३.        सर्वे नं.८० मधील काही जागेमधुन पांधन रस्ता गेलेला आहे, सदर रस्ता हा सर्वे नं.८० चा भाग आहे. रस्ता हा दक्षिण-पुर्व असा आहे. रस्ता हा नकाशामध्ये अ, ब, क, ड, इ आणि फ असा दर्शविण्यात आला आहे. रस्ता हा सार्वजनिक आहे. रस्ता गेल्यामुळे सर्वे नं.८० ची जागा कमी झाली आहे. रस्त्यामुळे किती क्षेत्रफळ कमी झाले हे मी सांगु शकत नाही. मोजणी हे प्लेन टेबल पद्धतीने करण्यात आली होती. मोजणीचे मापक हे १/१००० असे होते. सदर आर्टीकल 'अ' यास नि.क्र.९० देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे -</u>

४.        प्रतिवादी क्र.१ ते ५ गैरहजर, सबब उलटतपास नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी ६ ते ११ सुविद्य विधिज्ञ श्री. गुप्ता यांद्वारे -</u>

५.        सर्वे नं.८० मधील रोड सोडुन इतर रस्ता नाही. प्रचलित नकाशा (शासनाच्या मुळ नकाशाप्रमाणे) प्रमाणे तो रस्ता आहे. मोक्यावर केवळ एकच रस्ता आहे. मोक्यावरील रस्ता हा तुटक रेषेने नकाशामध्ये दाखविण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोक्यावरील रस्ता हा काही सर्वे नं.८० मधुन आणि काही प्रचलित नकाशाप्रमाणे, वरिल रस्त्यात मिळत आहे. रस्ता हा सर्वे नं.८० मधुन किती क्षेत्रफळामधुन गेला आहे आणि प्रचलित नकाशाप्रमाणे किती जागेतुन गेला आहे हे मी सांगु शकत नाही. नकाशामध्ये तुटक रेषेने जो रस्ता दाखविण्यात आलेला आहे आणि तो प्रचलित रस्तयावर आल्यावर, त्याला नाव देण्यात आले नाही. तुटक रेषेने जो रस्ता मी दाखविला आहे त्यांची रुंदी मी सांगु शकत नाही तसेच रस्त्याची रुंदी नकाशामध्ये नमुद केली नाही. मोजणी खुलासा क्र.१ मध्ये, अर्जदार व लगतच्या शेतक-यांनी जागेवर दाखविलेली ताबा वहीवाट आहे व ती तुटक रेषेने दाखविलेली आहे. सर्वे नं.८०

च्या पुर्वेकडे नकाशाप्रमाणे नाला आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रचलित नकाशाप्रमाणे सर्वे नं.८० च्या पुर्वेकडे कोणतीही पाणंद नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रकरण हे हदद कायम करण्याचे आहे. प्रचलित नकाशामध्ये आणि प्रत्यक्ष मोक्यावर असलेल्या जागेमध्ये काही तफावत असल्यास, क्षेत्र दरुस्त करण्याबाबत अर्जदाराला सांगतो. 'क' प्रतीमध्ये प्लेन टेबल हा कुठे ठेवण्यात आला होता याचा उल्लेख नसतो. सदरचा उल्लेख हा केवळ 'अ' प्रतीमध्ये असतो. मोजणीच्या वेळेस मी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना नोटीस पाठविली नव्हती, कारण ते लगतचे शेतकरी नव्हते. प्रतिवादी क्र. ४ आणि ५ हे मोजणीच्या वेळेस हजर नव्हते. विषय हा रस्त्याचा नसल्यामुळे मी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना स्वतःहुन नोटीस पाठविली नाही. तसेच अर्जदाराने प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा उल्लेख अर्जामध्ये केला नसल्यामुळेदेखिल नोटीस पाठविण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की मोजणी ही मी नियमाप्रमाणे केली नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराच्या सांगण्याप्रमाणे खोटा नकाशा बनविला. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI
L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.10.10 12:34:14 +0530

दिनांक ९/१०/२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)